प्रसिद्धी पत्रक
PRESS NOTE

CITY & INDUSTRIAL DEVELOPMENT CORPORATION OF MAHARASHTRA LTD.
**Regd. Office:** Nirmal, 2nd Floor, Nariman Point, Mumbai 400 021. Tel.: 91-22-6650 0900; FAX:91-22-6650 0933; www.cidcoindia.com
**Head Office:** CIDCO Bhavan, CBD Belapur, Navi Mumbai 400 614. Tel.: 91-22-6791 8241; Fax: 91-22-6791 8294;

For updated information, follow us on - @cidco_ltd :/cidco YouTube CIDCO Ltd. @cidco_ltd

दिनांक – २ मे २०२२

**सिडकोच्या निवासी, निवासी तथा वाणिज्यिक भूखंडांसह वाणिज्यिक गाळे विक्रीच्या योजनेकरिता अर्ज करण्यास मुदतवाढ**

सिडको महामंडळाच्या १५३ निवासी, १८ निवासी तथा वाणिज्यिक वापराच्या भूखंडांसह २७५ वाणिज्यिक गाळे विक्रीच्या योजनेच्या ई-निविदा आणि ई-लिलाव प्रक्रियेस मुदतवाढ देण्याचा निर्णय सिडकोतर्फे घेण्यात आला आहे. अक्षय्य तृतीया तसेच रमजान ईदच्या प्रसंगी नागरिकांना या सुवर्णसंधीचा मोठ्या प्रमाणावर लाभ घेता यावा यासाठी सिडकोतर्फे सदर योजनांना मुदत वाढ देण्यात आली आहे.

**“कोविड – १९ च्या पार्श्वभूमीवर सर्वसामान्य नागरिक, विकासक आणि व्यावसायिकांना दिलासा मिळावा म्हणून भूखंड व वाणिज्यित गाळे विक्रीची महायोजना आणण्यात आली होती. या योजनेस मुदतवाढ दिल्याने अधिकाधिक नागरिकांना या योजनेचा लाभ घेता येणार आहे. तसेच या सुवर्णसंधीमुळे नागरिकांचा येत्या अक्षय्य तृतीयेचा आणि रमजान ईदचा आनंदही द्विगुणीत होणार आहे.”**

**डॉ. संजय मुखर्जी**
**उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, सिडको**

या वर्षीच्या गुढी पाडव्याच्या मुहूर्तावर महायोजने अंतर्गत नवी मुंबईच्या विविध नोडमधील १५३ निवासी, १८ निवासी तथा वाणिज्यिक भूखंडांसह २७५ वाणिज्यिक गाळे विक्रीसाठी उपलब्ध करून देण्यात आले होते. या मुदतवाढीमुळे नागरिकांना योजनेकरिता अर्ज करण्यास पुरेसा अवधी देखील प्राप्त होणार आहे. या अनुषंगाने अनामत रक्कम भरणा, बंद निविदा सादर करणे, ई-लिलाव प्रक्रियांसही मुदतवाढ देण्यात आली आहे.

महाराष्ट्र शासनाच्या मार्गदर्शनाखाली सिडको महामंडळातर्फे ०२ एप्रिल २०२२ रोजी गुढी पाडव्याच्या मुहूर्तावर तीन स्वतंत्र योजनांतर्गत नवी मुंबईच्या विविध नोडमधील निवासी, निवासी तथा वाणिज्यिक वापराच्या भूखंडांसह वाणिज्यिक गाळे विक्रीकरिता उपलब्ध करून देण्यात आले होते. नवी मुंबईतील ऐरोली, घणसोली, नेरूळ, खारघर, पनवेल आणि कळंबोली नोडमध्ये खास बंगल्यांकरिता १५३ भूखंड उपलब्ध करून देण्यात आले होते.

नवी मुंबईतील ऐरोली, नेरूळ, खारघर, पनवेल आणि कळंबोली नोडमधील मोक्याच्या ठिकाणी निवासी तथा वाणिज्यिक वापराचे १८ भूखंड उपलब्ध करून देण्यात आले होते. तसेच नवी मुंबईच्या विविध नोडमधील सिडकोच्या प्रधानमंत्री आवास योजना प्रकल्पांतर्गत तसेच व्हॅलीशिल्प आणि स्वप्नपूर्ती गृहसंकुलांतील एकूण २७५ वाणिज्यिक गाळे विक्रीकरिता उपलब्ध करून देण्यात आले होते.

१५३ निवासी वापराच्या भूखंडांकरिता अर्ज सादर करण्यास व अनामत रक्कम भरण्यास ०६ मे २०२२ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. बंद निविदा सादर करण्यास ०५ मे २०२२ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. ई-लिलाव प्रक्रियेस ६ मे २०२२ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे तर योजनेचा निकाल ९ मे २०२२ रोजी जाहीर करण्यात येणार आहे.

१८ निवासी तथा वाणिज्यिक वापराच्या भूखंडांकरिता अर्ज सादर करण्यास व अनामत रक्कम भरण्यास ६ मे २०२२ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. बंद निविदा सादर करण्यास ५ मे २०२२ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. ई-लिलाव प्रक्रियेस ६ मे २०२२ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे तर योजनेचा निकाल ९ मे २०२२ रोजी जाहीर करण्यात येणार आहे.

२७५ वाणिज्यिक गाळ्यांकरिता अर्ज सादर करण्यास व अनामत रक्कम भरण्यास १७ मे २०२२ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. बंद निविदा सादर करण्यास १६ मे २०२२ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. ई-लिलाव प्रक्रियेस १७ मे २०२२ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे तर योजनेचा निकाल २० मे २०२२ रोजी जाहीर करण्यात येणार आहे.

सदर योजनांच्या सविस्तर माहितीकरिता अर्जदारांनी सिडकोच्या www.eauction.cidcoindia.com या संकेतस्थळास भेट द्यावी.

या महायोजनेमुळे सर्वसामान्य नागरिकांना नवी मुंबईसारख्या पायाभूत सुविधांनी परिपूर्ण शहरात आपला मनपसंत बंगला साकारण्याची संधी उपलब्ध झाली आहे तर विकासक आणि गुंतवणूकदारांना नवी मुंबईमध्ये निवासी किंवा वाणिज्यिक बांधकाम विकसित करण्याची संधी या योजनेद्वारे उपलब्ध झाली आहे.

तसेच नवी मुंबईमध्ये सातत्याने वृद्धिंगत होणाऱ्या वाणिज्यिक संधींचा लाभ घेण्याची संधीदेखील व्यावसायिकांना मिळाली आहे.

दिलेल्या मुदतवाढीचा फायदा घेऊन अधिकाधिक नागरिक, विकासक आणि व्यावसायिकांनी योजनेकरिता अर्ज करावेत आणि संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन सिडकोकडून करण्यात आले आहे.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

मा. संपादक महोदय,
वरील बातमीस आपल्या लोकप्रिय वर्तमानपत्रातून ठळक प्रसिद्धि देऊन उपकृत करावे, ही विनंती.

जनसंपर्क विभाग, सिडको